# धक्काशोषकांचं राजकीय उत्पादन

*वैध टीकेला सामोरं न जाण्यातून अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा येतात.*

यवतमाळ इथे झालेल्या (११-१३ जानेवारी) ९२व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला उद्घाटक म्हणून नयनतारा सहगल यांना बोलावण्यात आलं होतं, परंतु आपलं निमंत्रण कायम ठेवण्यात आयोजकच अकार्यक्षम ठरले. अनेक महत्त्वाच्या साहित्यिकांसह अनेकांनी या घटनेचा धिक्कार केला व त्यावर टीका केली. सहगल यांचं निमंत्रण रद्द करण्याचा आयोजकांचा निर्णय केवळ सहगल यांच्यासाठीच नव्हे तर अभिव्यक्ती स्वातंत्र्यासारख्या लोकशाही मूल्यांना मानणाऱ्या सर्वांसाठीच अस्वस्थकारक आहे. यातून तीन प्रश्न समोर येतात. एक, निमंत्रण मागे घेण्याचा निर्णय निश्चितपणे स्वाभिमानाचा अभाव दाखवणारा आहे, पण हा अभाव निमंत्रण देणाऱ्यांना वा यजमानांनाही जाणवला का? दोन, अशा निर्णयाला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे जबाबदार असलेल्यांच्या मनोबळावर याचे कोणते परिणाम होतात? आणि तीन, विचारांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यासारख्या लोकशाही मूल्यांचा बचाव करणाऱ्यांच्या स्वाभिमानात अशा निर्णयांमुळे घट होईल का?

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षांनी राजीनामा दिला, याचा अर्थ त्यांना मानहानी सहन करावी लागली असणार किंवा त्यांचा स्वाभिमान ढासळला असणार. या संदर्भात हा प्रश्न विचारायला हवा की, संबंधित अध्यक्षांसह कोणीही स्वतःच्या मानहानीमध्ये सहभागी का व्हावं? यावर पुढील उत्तर देता येईल : स्वतःच्या राजकीय आणि व्यावसायिक आशाआकांक्षांच्या सोयीसाठी संमेलनाच्या आयोजन समितीमधील काही सदस्यांनी धक्काशोषकाची (Shock Absorbers) भूमिका निभावली. निमंत्रण रद्द केल्यानंतर आयोजकांनी कठोर सार्वजनिक टीकेचा धक्काही या महत्त्वाकांक्षेच्या सक्तीमुळे शोषून घेतला. शिवाय, राज्यातील सत्ताधाऱ्यांचा दबावही आयोजकांनी सहन केला.

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी व शिक्षण मंत्र्यांनी आयोजन समितीच्या निर्णयाशी आपला काही संबंध नसल्याचं जाहीर केलं आहे. उद्घाटकीय भाषण रद्द करण्याच्या निर्णयामध्ये सरकारची प्रत्यक्ष काही भूमिका कदाचित नसेलही. पण, अशा निर्णयाच्या परिणामांचा लाभ सरकारला झाला, हे नाकारता येणार नाही.

आयोजकांना मानहानीच्या गर्तेत ढकलल्याची जबाबदारी राज्य सरकारला टाळता येणार नाही. मराठी साहित्य समुदायातील आघाडीच्या मंडळींनी कठोर टीका केल्यानंतर राज्यातील सत्ताधाऱ्यांनी स्वतःची लाज जाऊ नये म्हणून या धक्काशोषकांना पुढे केलं. पक्ष व सरकार अंतर्गत लोकशाही मूल्यांची चर्चा व्हावी, यासाठी अवकाश उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक नैतिक इच्छेचा अभाव असल्यामुळे धक्काशोषक घटकांकडून हे असं राजकीय फलित पुढे आलं.

सहगल यांचं भाषण सत्तेसमोर सत्यकथन करणारं होतं, आणि महाराष्ट्र व केंद्रातील सत्ताधारी आघाडीच्या बचावकर्त्यांकडे सत्तेची वैध चिकित्सा ऐकून घेण्याची इच्छा व क्षमता नाही, हे यातून दिसून आलं. याउलट, १९७५ साली कराडमध्ये झालेल्या ५१व्या साहित्य संमेलनात तत्कालीन केंद्रीय मंत्री यशवंतराव चव्हाण

मंचावर उपस्थित असतानाही संमेलनाध्यक्षा दुर्गा भागवत यांनी आणीबाणीचा धिक्कार केला होता. आदर्शलक्ष्यी मुद्द्यांवर चर्चा करण्यात शासक वर्गाला रस नसतो, ही बाब अशा प्रसंगांमधून अधोरेखित होते. उदाहरणार्थ, या वर्गाचे सदस्य कायम सत्ता काबीज करण्यासाठीच्या निखळ व्यूहरचनेवर लक्ष केंद्रित करतात. परंतु, या संदर्भातील चर्चेमध्ये समता, न्याय व प्रतिष्ठा अशी कोणती मूल्यं साध्य करायची असतात, याकडे मात्र शासक वर्गाचे सदस्य दुर्लक्ष करतात. स्वतःविषयीच्या खुलाश्यासाठी किंवा स्वतःच्या शंका मिटवण्यासाठी अशा चर्चा महत्त्वाच्या असतात. इतरांसोबतच्या चर्चेत कोणाला रस वाटत नसेल, तर किमान बंद दरवाज्याआड तरी अशी चर्चा व्हायला हवी. सत्ताधारी पक्षाचे सदस्य सरकारी मंचांवर किंवा पक्ष बैठकींमध्ये तरी मानवी मूल्य व वैश्विक तत्त्वांसंबंधीच्या चर्चेला किंमत देतात का, याची काहीच कल्पना आपल्याला येऊ शकत नाही. केवळ सत्ता काबीज करणं व नियंत्रण करणं, यासाठीच्या व्यूहरचनेवरच ते आपला सर्व वेळ व ऊर्जा खर्च करतात का, असाही प्रश्न या संदर्भात समोर येतो. पक्ष व सरकार अशा दोन्ही पातळ्यांवर गंभीर चर्चांना कायम फाटा दिला जातो. त्यामुळे आपल्या विचारसरणीय पूर्वग्रहाच्या बचावासाठी अशा दुहेरी प्रतिबंधाचा एकमेव मार्ग उरतो. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांना १९३६ साली लाहोर इथे जात-पात-तोडक मंडळाच्या वार्षिक परिषदेसाठी उद्घाटकीय भाषण देण्यासाठी निमंत्रित करण्यात आलं, पण प्रत्यक्षात त्यांना ते भाषण देता आलं नाही, आणि आता २०१९ साली सहगल यांच्या बाबतीतही हेच घडलं. या दोन्ही प्रसंगांमध्ये उपरोल्लेखित दुहेरी प्रतिबंधाचा मुद्दा लागू होताना दिसतो.

सहगल यांना आघाडीच्या साहित्यिकांनी वाढता पाठिंबा दिला आणि त्यांच्या जागी उद्घाटक म्हणून उपस्थित राहाण्याच्या आयोजकांच्या विनंतीला ठाम नकारही दिला, यावरून लोकशाही मूल्यांच्या समर्थक असलेल्या सहगल यांच्याविषयीचा मराठी साहित्यिकांचा वृद्धिंगत आदर दिसून येतो. आणि, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे वैरी असलेल्यांची नैतिक अवनतीही यातून सिद्ध होते.

●

## दुतोंडी आरक्षण

*उच्च जातींमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल समाजघटकांना १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय सामाजिक न्यायाच्या पायाभूत तत्त्वांना अपकीर्ती आणणारा आहे.*

आर्थिकदृष्ट्या दुर्बल समाजघटकांमधील उच्चजातीय इच्छुकांना रोजगारामध्ये व शिक्षणात १० टक्के आरक्षण देणारा कायदा संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये मंजूर झाला. येऊ घातलेल्या २०१९च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकांच्या संदर्भात केंद्र सरकारने ही कृती वेगाने केली आहे, त्यामुळे बहुतांश पक्षांनाही या निर्णयाचा विरोध करणं राजकीयदृष्ट्या गैरसोयीचं बनलं. हा कायदा ज्या पद्धतीने संसदेत मांडण्यात आला त्याबद्दल काहींनी आक्षेप व्यक्त केला. हा कायदा अंतिम मंजुरीसाठी संसदेत मांडण्यापूर्वी चर्चेसाठी केंद्र सरकारने पुरेसा वेळ दिला नाही, असं सांगत या सदस्यांनी सरकारच्या प्रक्रियेला विरोध केला. शिवाय, शैक्षणिक व आर्थिक मागासपणाचा निकष निश्चित करताना सरकारने स्वीकारलेल्या प्रक्रियेविषयीही आक्षेप घेण्यात आले. उचित स्थापना झालेल्या एखाद्या आयोगाकडून योग्य व सखोल दस्तावेजीकरण न करताच सरकारने १० टक्के हा आकडा कुठून काढला? या कायद्यामध्ये वरील समस्या असल्या आणि सर्वोच्च न्यायालयाकडून मंजुरी मिळायची असली, तरी अशा कायद्याच्या संभाव्य लाभांबाबत १० टक्के आरक्षणाच्या मुद्द्यावर काही

चिंतन करावंच लागेल.

न्यायालयाने या कायद्याला मान्यता दिली आणि सरकारने त्याची अंमलबजावणी केली, तरी उच्च जातीयांमधील गरजूंना त्याची मदत होणं अपेक्षित आहे. अनुसूचित जाती (एससी : शेड्युल्ड कास्ट) व अनुसूचित जमाती (एसटी : शेड्युल्ड ट्राइब) यांची बनावट प्रमाणपत्रं घेऊन व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेऊ पाहणाऱ्यांची निराशाही यातून काहीशी दूर होईल, अशी अपेक्षा आहे. शिवाय, एससी/एसटी प्रमाणपत्र मिळवण्यासाठी एससी/एसटी कुटुंबांमध्ये दत्तक जाण्याची खटपट करणाऱ्या सवर्ण इच्छुकांनाही या कायद्यामुळे पायबंद बसेल. स्वतःच्या ओळखीच्या बाबतीत बनावटपणा करण्याची वेळ त्यांच्यावर येऊ नये, इतपत तजवीज हा कायदा करेल. बनावट प्रमाणपत्रधारक असल्याचं उघड झाल्यावर या लोकांना न्यायालयात जी मानहानी सहन करावी लागते, तीही या कायद्यामुळे टळेल. एससी, एसटी व इतर मागास वर्गीय (ओबीसी : अदर बॅकवर्ड क्लास) यांच्यासोबत आपणही आरक्षणाच्या कक्षेत असावं, ही उच्च जातीयांची इच्छा या १० टक्के आरक्षणाने पूर्ण होईल, अशी अपेक्षा आहे.

शेवटी सर्वांत महत्त्वाचं- आरक्षणामुळे राष्ट्रीय ऐक्याला छेद जातो आणि जातीयवाद टिकून राहातो, असा समज उच्च जातीयांमध्ये व्यापक प्रमाणात पसरलेला असतो, पण या १० टक्के आरक्षणामुळे त्यांना असा समज दूर ठेवावा लागेल. उच्च जातीयांकडून आरक्षणावर वारंवार टीका होत असते, पण आता अशा युक्तिवादामुळे त्यांनाच नैतिक इजा पोहोचेल.

अशा राखीव जागांना होकार दिल्यास सवर्णांसाठी वा उच्चजातीयांसाठी करण्यात आलेल्या या कायद्याशी संबंधित व्यापक समस्येकडे आपलं दुर्लक्ष होऊ शकतं. दहा टक्के राखीव जागांचा निर्णय आरक्षण धोरणाच्या मूळ आदर्शलक्ष्यी पायालाच छेद देणारा आहे. अनुसूचित जातींना लाभ व्हावा म्हणून या धोरणाची सुरुवात झाली. परंतु, १० टक्के आरक्षणाच्या नवीन कायद्यानुसार केवळ आर्थिक निकषांवर संभाव्य लाभार्थ्यांना राखीव जागांचा लाभ घेता येणार आहे, त्यासाठी अस्पृश्यतेची झळ सोसलेली असणं गरजेचं नाही. अनुसूचित जातींना आरक्षण देताना अस्पृश्यतेचा संदर्भ पायाभूत होता. जातीय अत्याचार किंवा सामाजिक बहिष्कार यांसारख्या लादलेल्या अपंगत्वातून उद्भवणाऱ्या सभ्यताजन्य (सिव्हिलायझेशनल) हिंसाचाराला सामोरं न गेलेल्यांनाही हे नवीन आरक्षण मिळणार आहे. उच्चजातीयांनाही गरीबीमुळे वंचित राहावं लागलं असेल, तरी भौतिक गरिबी हा आरक्षणाचा एकमेव निकष मानल्याने अनुसूचित जातींना ज्या मूळ निकषानुसार आरक्षण मिळालं तो निकष क्षीण होईल. अनुसूचित जातींना आरक्षित जागा देण्याचं समर्थन करताना अस्पृश्यतेची रुढी व लादलेलं सामाजिक अपंगत्व हे महत्त्वाचे निकष राहिलेले आहेत. त्यामुळे राज्यघटनेने अस्पृश्यता नष्ट केली, तरीही प्रत्यक्षात विविध रूपांमध्ये अस्पृश्यतेची रुढी टिकून आहे, अशा युक्तिवादाद्वारे अनुसूचित जातींच्या आरक्षणाचा बचाव केला जातो.

जातीय पूर्वग्रहाचा विध्वंसक प्रभाव दूर राहावा यासाठी राखीव जागा वा आरक्षण ठेवणं आवश्यक मानलं गेलं आहे. अनेकदा जातीय पूर्वग्रहामुळेच अशा तरतुदींची अंमलबजावणी थोपवली जाते किंवा लांबणीवर टाकली जाते. अशा पूर्वग्रहातून अन्यायकारक परिस्थिती उद्भवू नये म्हणून राखीव जागांची तरतूद केली जाते. या जागांचा लाभ अनुसूचित जाती-जमातींना व्हावा यासाठी अंमलबजावणीत किमान प्रामाणिकपणा असावा लागतो. त्यामुळेच जातीय पूर्वग्रहाला चाप बसवण्यात अशा सकारात्मक कृती अपुऱ्या असल्याचंही म्हटलं जातं. आपण अंमलात आणलेल्या सकारात्मक कृती केवळ समान संधी देतात, निष्पत्तीची समानता देत नाहीत. राज्यघटनेने सकारात्मक कृतीपलीकडे जात निश्चित राखीव जागा दिल्या.

या व्यापक आदर्शलक्ष्यी संदर्भामध्ये विद्यमान सरकारच्या १० टक्के राखीव जागांच्या धोरणाचा विचार

करावा लागेल. या राखीव जागा अनिवार्य करण्यामागे सदरहू सरकारचा कोणता पूर्वग्रह कार्यरत होता? सवर्णांना राखीव जागा देण्यामागे जातिआधारित पूर्वग्रह तर निश्चितपणे कारणीभूत नाही.

अन्याय्यकारकता हा घटक अस्पृश्यतेच्या रुढीमध्ये रुजलेला आहे, तर निखळ आर्थिक मागासपणा हा सवर्णांना रोजगार उपलब्ध करून देण्यातील व्यवस्थात्मक अक्षमतेमधून निर्माण झालेला आहे. संधी कमी होण्याला अस्पृश्यता कारणीभूत नसून पात्र व गरजू लोकांना पुरेसा रोजगार देण्यात राज्यसंस्था व बाजारपेठ यांना अपयश आलं आहे त्यामुळं संधी विरळ झाल्या आहेत. सवर्ण आरक्षणामध्ये निवडक मागासपणा दिसून येतो, पण अनुसूचित जातींना आरक्षण देताना राज्यघटनेतील अनेक अनुच्छेदांमध्ये व खंडांमध्ये सर्वांगीण मागासपणा लक्षात घेतलेला आहे.

●

---

## दहा टक्क्यांना रोजगार कुठून देणार?

*उच्च जातीय गरीबांना १० टक्के राखीव जागा मिळाल्या तरी त्यातून रोजगाराच्या संधी मिळतीलच असं नाही.*

रोजगार संरक्षणासाठी केंद्र सरकार करत असलेल्या क्लृप्त्या– विशेषतः अलीकडेच १० टक्क्यांच्या राखीव जागांवरून होत असलेलं राजकारण– पाहिलं की एकोणिसाव्या शतकातील एक बंगाली कविता आठवते. या कवितेत वर्णन केलेल्या चालण्याला आधारभूत अशा एका उपकरणाशी साम्य वाटेल अशी धोरणं सरकार अंमलात आणतं आहे. हे उपकरण संबंधित व्यक्तीच्या खांद्याला पट्टीने बांधलेलं असतं आणि त्याच्या पुढच्या बाजूला 'गाजरं' लावलेली असतात. त्या गाजराच्या मोहाने चालणारी व्यक्ती मैलोन्–मैल चालत जाऊ शकते, पण कितीही वेगाने धावलं तरी गाजर विशिष्ट अंतरावरच राहातं. उदाहरणार्थ, 'आर्थिकदृष्ट्या' दुर्बल उच्च जातीयांसाठी नोकऱ्यांमध्ये व अकादमिक संस्थांमध्ये १० टक्के आरक्षण ठेवण्याची सरकारची सनसनाटी कृती विचारात घेता येते. या संदर्भातील राजकीय गदारोळ बघता निवडणुकीय व्यूहरचना म्हणून ही कृती परिणाम ठरली, हे नाकारता येणार नाही. परंतु रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या बाबतीत हे धोरण फोल ठरेल, हेही कोणाला नाकारता येणार नाही. उपरोल्लेखित बंगाली कवितेसारखं सतत गतीमान करणारं हे उपकरण आहे, यातून भूक भागवण्यापेक्षा टिकवण्यावर भर असतो. राखीव जागांची ताजी घोषणा कोणत्याही महत्त्वाच्या रोजगारभरतीसाठी अशीच निरर्थक ठरणारी आहे.

मुळात रोजगाराच्या संधी कुठे आहेत? 'सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी' (सीएमआयई) या संस्थेने प्रसिद्ध केलेल्या ताज्या अहवालानुसार, भारतीय रोजगार बाजारपेठेमधील परिस्थिती दुष्कर आहे: एक, डिसेंबर २०१८मधील आखडेवारीनुसार बेरोजगारीचा दर ७.४ टक्क्यांपर्यंत वर गेला होता. गेल्या १५ महिन्यांमधील हा बेरोजगारीचा उच्चांक आहे. दोन, डिसेंबर २०१७ व २०१८मधील रोजगारकपातीचा फटका बसलेल्यांची संख्या एक कोटी १० लाख इतकी आहे. या श्रमशक्तीचा समावेशही आता बेरोजगारांमध्येच आहे. तीन, (आर्थिकदृष्ट्या) असुरक्षित क्षेत्रांमध्ये व घटकांमध्ये बेरोजगाराची प्रादुर्भाव सर्वाधिक आहे (उदाहरणार्थ, सुमारे ८२ टक्के नोकऱ्या ग्रामीण भागांमध्ये कमी झाल्या; या भागांना आधीच शेतकी संकटाला सामोरं जावं लागतं आहे, आणि यातील जवळपास ८० टक्के रोजगारकपातीचा फटका स्त्रियांना बसला). भारतीय

जनता पक्षाच्या (भाजप) नवीन 'असुरक्षिततें'च्या राजकारणाच्या केंद्रस्थानी हेच घटक आहेत, हा विरोधाभास म्हणावा लागेल.

सदर आकडेवारी हंगामी अंदाजासारखी आहे, असा दावा सीएमआयईने केला असला, तरी अंतिम अंदाजी आकडेवारीमध्येही या परिस्थितीत विलक्षण बदल होण्याची शक्यता नाही. सरकारी क्षेत्रातील भरती दुबळी झाली आहे, त्यातील एक तृतीयांश रिकाम्या जागा 'आरक्षित' प्रवर्गातील आहेत. त्याचप्रमाणे, ऐतिहासिकदृष्ट्या रोजगाराचा स्त्रोत राहिलेलं असंघटित व अनौपचारिक क्षेत्रही निश्चलनीकरण आणि वस्तू व सेवा कर या 'लक्ष्यभेदी हल्ल्यां'च्या धक्क्यातून सावरलेलं नाही. सर्वोच्च न्यालयाने आरक्षणावर ५० टक्क्यांची कमाल मर्यादा घातलेली आहे, त्याचं उल्लंघन केल्याने आत्ताच्या घडीला भाजपला अधिकचे निवडणुकीय साथीदार मिळू शकतात आणि हिंदी पट्ट्यातील 'दुर्बल' मतदारांकडून काही आस्थाही मिळेल. २०१८मधील विधानसभा निवडणुकांमध्ये याच पट्ट्यात भाजपला पराभव सहन करावा लागला होता. परंतु यातून असुरक्षित मतदारांमध्ये वाढच होईल. उपलब्ध नोकऱ्यांच्या संख्येपेक्षा दुप्पटीहून जास्त लोक रोजगाराच्या शोधात आहेत, आणि आरक्षणाच्या संभाव्य लाभार्थ्यांना यातून फारसा लाभ होणारा नाही.

आजच्या राजकीय वक्तृत्वामध्ये 'तरुणाईच्या आकांक्षा' हा शब्दप्रयोग वारंवार होतो, पण अशा आकांक्षा समजून घेण्याची इच्छा मात्र राजकीय वर्गात दिसत नाही. रोजगाराच्या किंवा नोकऱ्यांच्या नावाखाली संदिग्ध आश्वासनांची गाजरं दाखवली की या मतदारांचा राजकीय पाठिंबा आपल्याला मिळेल, असं बेफिकीरीचं गृहितक यामागे असल्यासारखं दिसतं. रोजगार बाजारपेठेत तरुणाच्या कर्तेपणाला अशा रितीने जाणीवपूर्वक धुळीला मिळवून सरकार अल्परोजगाराच्या वास्तवाकडे काणाडोळा करतं आहे.

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या 'वर्ल्ड एम्प्लॉयमेन्ट अँड सोशल आउटलूक : ट्रेन्ड्स २०१८' या अहवालामध्ये नमूद केल्यानुसार, भारतातील जवळपास चार पंचमांश रोजगार 'असुरक्षित' गटात मोडतात, आणि एक पंचमांशाहून कमी कामगार नियमित पगारदार स्वरूपाचे आहेत, तर दोन पंचमांशांना स्वतःचा पगार असमाधानकारक वाटतो. अल्पविशेषाधिकारी रोजगार परिस्थितीसंबंधीचा आणखी तुल्यबळ पुरावा 'स्टेट ऑफ वर्किंग इंडिया २०१८' या अझीम प्रेमजी विद्यापीठाच्या अहवालातूनही मिळतो. कमी वेतनाच्या रोजगाराची क्षमता संघटित क्षेत्रातही असल्याचं, या अहवालात म्हटलं आहे. असंघटित क्षेत्राबद्दल तर बोलायलाही नको. महागाईला जुळवून घेणाऱ्या वेतन दरांमध्ये २०१५ साली तीन टक्क्यांची वार्षिक वाढ होऊनही ८२ टक्के पुरुष आणि ९२ टक्के स्त्रिया (मुख्यत्वे बिगरसरकारी क्षेत्रातील) यांचं सरासरी मासिक उत्पन्न सातव्या वेतन आयोगाने केलेल्या किमान पगाराच्या शिफारसीपेक्षा जवळपास ४० टक्क्यांनी कमी होतं. त्याचप्रमाणे श्रम उत्पादकता आणि वेतन यांच्यातील तफावतही वाढत आहे. उदाहरणार्थ, संघटित उत्पादनातील श्रम उत्पादकता गेल्या तीन दशकांमध्ये सहा पटींनी वाढली, असा अंदाज आहे. पण वेतनामधील वाढ केवळ दीड पटीची होती.

हा सर्व पुरावा समोर मांडल्यानंतरही कोणी असा युक्तिवाद करू शकतं की, भारतातील सध्याची बेरोजगारी- विशेषतः तरुणांमधील बेरोजगारी ही 'प्रत्यक्षा'त असण्यापेक्षा 'संभाव्य' स्वरूपात असण्याची शक्यता आहे. म्हणजे कामासाठी इच्छुक असलेले तरुण-तरुणी नोकऱ्या शोधण्यासाठी प्रयत्न करत नाहीयेत, कारण त्यांच्या पगाराच्या व विशेषाधिकारांच्या अपेक्षा विद्यमान नोकऱ्यांकडून पूर्ण होणाऱ्या नाहीत. तरुणाई पगारदार नोकऱ्यांना- विशेषतः सरकारी क्षेत्रातील नोकऱ्यांना अधिकाधिक प्राधान्य देताना दिसते. त्यामुळे बेरोजगारीची जबाबदारी बेरोजगारांवरच पडण्याची शक्यता आहे. पण बेरोजगारी प्रत्यक्षातील असो,

संभाव्य असो किंवा अल्परोजगारी असो, त्याचा संबंध कमी किंवा शून्य रोजगारनिर्मितीशी असतो, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. आर्थिक वृद्धी आणि रोजगारनिर्मिती यांच्यातील संबंध कमकुवत करणारे रचनात्मक अडथळे ओळखणं व त्यावर उपाय करणं, ही सरकारची जबाबदारी आहे. आधीच आकुंचित पावलेल्या रोजगार बाजारपेठेत 'आरक्षण' कोंबून (वाढवून) सरकारने स्वतःचाच ढोंगीपणा दाखवला आहे, हे नाकारता येणार नाही (आरक्षण हे मूलतः आत्यंतिक असुरक्षितावस्थेतील व्यक्तीच्या संरक्षणासाठी आहे).

तरुणाईमधील- विशेषतः उच्चशिक्षित तरुण वर्गामधील बेरोजगारीचा वाढलेला दर हा त्यांच्या निवडीतील समस्येमुळे उद्भवलेला आहे, असा युक्तिवाद केला जात असला तरी अशा निवडी मार्गावलंबी बनण्यामधील आपली भूमिका सरकारला झिडकारता येणार नाही. मतदारवर्गाला केलेली संरक्षणाची (आरक्षणाची) सर्व खोटी आश्वासनं पराभूत अपेक्षांचं दुष्टचक्र सुरू करणारी ठरतात. मोठमोठी आश्वासनं देऊन प्रत्यक्षात 'असुरक्षितता' वाढवणारी धोरणं राबवली जातात, त्यातून आणखी आश्वासनांच्या राजकीय मागण्या व्हायला लागतात.

●

---

## 'बेस्ट'ला खाजगीकरणाचा धोका

*मुंबईतील 'बेस्ट' बस कर्मचाऱ्यांचा संप आणि त्यातील अंतःस्थ मुद्दे यावरून भारतातील नागरी सार्वजनिक वाहतुकीची दुरवस्था दिसून येते.*

नऊ दिवस- ८ ते १७ जानेवारी २०१९ मुंबईची एक ऐतिहासिक ओळखीची खूण रस्त्यांवरून गायब झाली होती. बृहन्मुंबई इलेक्ट्रिक सप्लाय अँड ट्रान्सपोर्ट अर्थात बेस्टच्या बस या नऊ दिवसांमध्ये रस्त्यांवरून धावल्या नाहीत. लाखो लोकांच्या दैनंदिन वाहतुकीचा आधारस्तंभ असलेल्या या बस वाहतुकीसाठी उपलब्ध न झाल्यामुळे या नियमित प्रवाश्यांची प्रचंड गैरसोय झाली आणि या दिवसांमध्ये मोठी तणावाची परिस्थिती उद्भवली. सार्वजनिक व खाजगी वाहतुकीच्या इतर पर्यायांची सेवा न पोचणाऱ्या भागांना या संपाचा विशेष फटका बसला. काही ठिकाणी विद्यार्थ्यांना परीक्षांना जाता आलं नाही. परंतु, बेस्ट कामगार संघटनेच्या या संपाचे दोन पैलू आहेत. एक, अलीकडच्या काळातील हे असं सर्वांत दीर्घ आंदोलन असलं तरी जनतेची व प्रवाशांची सहानुभूती कामगारांच्या बाजूने होती. शिवसेनेशी संलग्न संघटनांनी फोडाफोडीच्या क्लृप्त्या लढवूनही कामगारांनी संयुक्त कृती समितीचं नेतृत्व टिकवून ठेवलं. दोन, मुंबई उच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर बस पुन्हा रस्त्यावर आल्या असल्या, तरी आता बेस्ट खाजगी हातांमध्ये जाईल किंवा खाजगी वाहतुकीचा लाभ व्हावा यासाठी तिच्याकडे दुर्लक्ष केलं जाईल, अशी सर्वसाधारण भावना असल्याचं दिसतं. यातील कोणतीही परिस्थिती एकूणच सार्वजनिक वाहतुकीच्या आणि मुंबईच्या रहिवाश्यांच्या भवितव्यासाठी इष्ट नाही.

बेस्टच्या बसद्वारे मुंबई शहर, उपनगरं, मिरा-भाईंदर, नवी मुंबई व ठाणे या प्रदेशांना सेवा पुरवली जाते. गेल्या दोन दशकांमध्ये ही सरकारी कंपनी मरणांतिक वेदना सहन करते आहे. खराब नागरी नियोजन, सरकारी सेवांपेक्षा खाजगी घटकांना प्राधान्य देणारी धोरणं आणि सर्वसामान्य नागरिकांच्या सार्वजनिक गरजांविषयीची बेफिकिरी, याला आणखी एक संस्था बळी पडणार असल्याचे संकेत यातून मिळू लागले. वेगवान व अनियोजित नागरीकरण व कुशासन यातून भारतभर ही

परिस्थिती उद्भवताना दिसते. बेस्टच्या संदर्भात कंपनीचे डेपो असलेल्या अनेक मोक्याच्या जागा विकून टाकण्यात आल्या, नफादायी नसल्याचं कारण देत अनेक प्रवासी मार्ग रद्द करण्यात आले, बस-भाडं वाढवण्यात आलं, यांत्रिक देखरेख खालावली, आणि श्रमशक्तीही कमी करण्यात आली, हे सर्व लोकांनाही माहिती झालेलं आहे.

भारतातील नागरी सार्वजनिक वाहतूक तुटक व संकुचित नागरी नियोजन व शासनाची ओलीस बनलेली आहे, याचं उत्तम उदाहरण बेस्टच्या रूपाने आढळतं. तथाकथित नफादायी नसलेले मार्ग बंद करणं आणि पायाभूत देखरेख व वाढ यांमध्ये कमकुवत गुंतवणूक करणं, हे विपरित परिणाम साधणारे उपाय आहेत. उचित सरकारी अनुदान नसेल तर विकसनशील देशांमधील सार्वजनिक वाहतूक कार्यरत राहू शकत नाही, हे सर्वज्ञात आहे. 'तोट्यां'ना दुसऱ्या बाजूने अनुदान लाभेल आणि गुंतवणूक अद्ययावत राहील असा रितीने बेस्ट प्रशासनाने ही कंपनी चालवायला हवी. या कंपनीचा अर्थसंकल्प बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पनात विलीन करावा, अशीही बेस्ट कामगारांची मागणी आहे. ही महत्त्वाची मागणी विचारात घेणं आवश्यक आहे.

परंतु, इतर भारतीय शहरांप्रमाणे मुंबईतही कार-केंद्री प्रकल्पांसाठी रस्ते नियोजन करण्याला प्राधान्य दिलं जातं. बसमधून जाणाऱ्या प्रवाशांची संख्या कमी होत असल्याचा व आश्रयदातृत्वही कमी झाल्याचा मुद्दा प्रशासन वारंवार मांडत राहातं. पण, हेही खराब नियोजनामुळेच झालेलं आहे. देशातील कुठलीही बहुसंख्य जनता दैनंदिन वापरासाठी जाणीवपूर्वक महागड्या खाजगी वाहतुकीला प्राधान्य देईल, असं मानणं हास्यास्पद आहे. रस्त्यांवरील वाहतूककोंडी, पदपथांची दुरवस्था- किंबहुना अनुपस्थिती यांमुळे पादचाऱ्यांना रस्त्यांवरून चालणं भाग पडतं, आणि ऑटोमोबाइल उद्योगाला अविचारीपणे सूट दिली जाते- या सगळ्यातून बेस्टची सेवा अधिक वेळखाऊ होते व नियमित प्रवाशांना अव्यवहार्य ठरते. याचा परिणाम म्हणून केवळ मुंबईतच नव्हे तर नागरी भारतात सर्वत्रच दुचाकी वाहनांचा वापर वाढला आहे, त्यामुळे वाहतूककोंडीतही भरच पडत जाते. व्यक्तिगत मोटर वाहतुकीपेक्षा कार्यक्षम सार्वजनिक वाहतूक ही निर्विवादपणे अधिक इष्ट निवड आहे.

बेस्टचं परस्पर-उपयुक्तता प्रारूप सुरू ठेवण्याला सर्वोच्च न्यायालयाने २०१६ साली खीळ मारली. व्यक्त झालेल्या अंदाजांनुसार निधीच्या अभावामुळे सेवा कोलमडली आणि संसाधनांमधील गुंतवणूक खालावली. कामगारांची संख्या कमी झालीच, शिवाय अनेक कामगारांना निवृत्तीनंतरच्या लाभांना मुकावं लागलं. तेव्हापासून बृहन्मुंबई महानगरपालिकेने हंगामी भाडेकरारावर (इतर एखाद्या कंपनीला विशिष्ट कालावधीसाठी कंत्राट देणं) बस चालवायला देण्याचं समर्थन वारंवार केलेलं दिसतं. केवळ अंशतः खाजगीकरण केलं तरच बेस्टची सेवा तरण्याची शक्यता आहे, या सूचनेची पुनरुक्ती महानगरपालिका प्रशासनाने ताज्या संपावेळीही केली. परंतु, रस्त्यांवर फारशी सार्वजनिक वाहतूक सेवा नसलेल्या अनेक राज्यांच्या उदाहरणांवरून दिसतं त्यानुसार, खाजगीकरण हेही खरं उत्तर नाही. खाजगी तत्त्वावर चालणारे बसचे मार्ग नफादायित्वाच्या निकषावर चालतात, त्यामध्ये प्रवाशांची गरज पाहिली जात नाही. खाजगी कंपन्या कर्मचाऱ्यांना अत्यल्प वेतन देतात आणि खराब देखरेख असलेल्या वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी कोंबतात, त्यामध्ये प्रवाशांच्या सुरक्षेचा कोणताही विचार केला जात नाही.

मुंबईत झालेला हा संप आणि बेस्टसमोरच्या समस्या, या गोष्टींचा विचार करता धोरणांमध्ये व प्राधान्यक्रमांमध्ये बदल होण्याची गरज अधोरेखित होते. सार्वजनिक वाहतुकीचं व्यापक जाळं असल्याशिवाय कोणतंही भारतीय शहर सर्वोत्तम क्षमतेने कार्यरत राहू

शकत नाही. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे ऑटोमोबाइल उद्योग व कार-केंद्री उपाय यांवर लक्ष केंद्रित करण्यापासून सरकारने फारकत घ्यायला हवी. परंतु, राज्य पातळीवर आणि स्थानिक शासन पातळीवर विस्तार व आधुनिकीकरणासाठी सार्वजनिक वाहतुकीला निधी पुरवणं, हा सर्वांत मोठा बागुलबुवा उभा करण्यात आलेला आहे. या सर्व पैलूंवर हवेची गुणवत्ता व भारतातील शहरांच्या वाहतुकीची कार्यक्षमता अवलंबून असणार आहे.

हे काम सोपं नाही आणि त्यात नागरिकांचे मंच व वाहतूक संघटनांचा सहभाग गरजेचा आहे. शिवाय, तीव्र राजकीय इच्छाशक्तीही आवश्यक आहे. देशातील नागरीकरणाचा वेग पाहता, इतर राज्यांसाठी बेस्टचा दाखला पथदर्शी ठरू शकतो. शहरांच्या व एकूणच नागरी जीवनाच्या स्वरूपाला आकार देण्यामध्ये कामगारांची सामूहिक कृती किती महत्त्वाची ठरते, हे या संपाने अधोरेखित केलं आहे.

●

---

## किनाऱ्यांना आकार देताना

*‘किनारपट्टी नियमन क्षेत्र, २०१८’ ही अधिसूचना पर्यावरण आणि मच्छिमारांची उपजीविका यांना फाटा देऊन नफेखोरीला प्राधान्य देणारी आहे.*

पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने मंजूर केलेली ‘किनारपट्टी नियमन क्षेत्र, २०१८’ ही अधिसूचना काही कठोर तरतुदींना फाटा देणारी आहे, जेणेकरून पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील प्रदेशांमध्ये विकासकामांना विस्तारण्याची परवानगी देता येईल. आधी हे प्रदेश कायद्याने सुरक्षित ठेवलेले होते. नवीन धोरणानुसार किनारपट्टी नियमन क्षेत्राची व ना-विकास क्षेत्राची कक्षा कमी होईल आणि लोकसंख्येच्या घनतेनुसार किनारपट्टी क्षेत्र प्रदेशाचं वर्गीकरण होईल. संरक्षणासाठी व सार्वजनिक उपयुक्ततेसाठी गरजेचे ‘सामरिक प्रकल्प’ उभारण्याकरिता पर्यावरणीयदृष्ट्या सर्वांत महत्त्वाचे प्रदेशही या अधिसूचनेच्या अखत्यारित आणले गेले आहेत. किनारपट्टी नियमन क्षेत्र-१मधील क्षेत्रांनाही यातून वगळण्यात आलेलं नाही. तरीही, मच्छिमारांच्या संदर्भात पर्यावरणीय न्याय व वाटपविषयक न्याय याबाबत ही नवीन अधिसूचना काय परिणाम करू शकते?

नाजूक किनारपट्टी प्रदेशांमध्ये व्यावसायिक व औद्योगिक कामकाजाच्या व्यापक हस्तक्षेपाला सुकरता देऊन या नवीन धोरणाने मानव-पर्यावरण समतोल बिघडवला आहे. यातून समुद्री परिसंस्थेची आणखी हानी होईल आणि तिथल्या संसाधनांवर अवलंबून असलेल्या लोकांची उपजीविका नष्ट होईल- विशेषतः किनाऱ्यांवर जगणाऱ्या कारागीर मच्छिमारांवर याचा मोठा परिणाम होणार आहे. आधीच हवामानबदलामुळे समुद्रपातळी वाढते आहे, त्यातून किनारपट्टीची झीज झाली आहे आणि इतरही काही धोके निर्माण झाले आहेत. अशा परिस्थितीत जगभरातील सखल प्रदेशात राहणाऱ्या लोकांचं जगणं धोक्यात आहे. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर आणि पूर्व किनाऱ्यांवरील नद्यांच्या त्रिभुज प्रदेशांजवळ असलेल्या प्रदेशांना यातून सर्वाधिक धोका असल्याचं म्हटलं जातं. या पार्श्वभूमीवर नवीन अधिसूचना कोणाच्या हितसंबंधांना पूरक आहे?

केंद्र सरकारने भारताच्या संपूर्ण किनारपट्टीला व्यापणारा महत्त्वाकांक्षी सागरमाला प्रकल्प आखला आहे, यासाठी ८.५ खर्व रुपये इतका खर्च होणार असून विविध व्यावसायिक उपक्रम तिथे राबवले जाणार आहेत. नवीन अधिसूचना या प्रकल्पाच्या विनाअडथळा अंमलबजावणीची वाट सुकर करणारी आहे, त्याचबरोबर

किनारपट्टीवर पायाभूत रचना विकसित करणं, स्थावर मालमत्ता व पर्यटन यांना चालना देणं आणि किफायतशीर घरबांधणी करणं- अशाही उपक्रमांना यातून चालना मिळेल. अशा उपयुक्ततावादी दृष्टिकोनाच्या धोरणातून व्यावसायिक हितसंबंधांविषयीचा पक्षपाती भाव उघड होतो. किनाऱ्यांवरील परिसंस्था, संवर्धन व मच्छिमार यांच्या गरजांकडे या अधिसूचनेने दुर्लक्ष केलं आहे. शतकानुशतकं किनाऱ्यांचा ताबा ज्यांच्याकडे आहे ते मच्छिमार समुद्राकडे केवळ एक स्रोत म्हणून पाहत नाहीत. त्यामुळे किनारपट्टीवरील संसाधनं व सामायिक स्रोतांचं व्यापारीकरण करून आणि अनिर्बंध वापर करून नफा कमावू पाहणाऱ्या हितसंबंधी गटांशी मच्छिमारांचा कायमच संघर्ष होतो.

मुंबई व चेन्नईसारख्या किनाऱ्यांवरील शहरांमध्ये नागरीकरण वाढतं आहे, जमीन वापराच्या आकृतिबंधामध्ये बदल होतो आहे, किनाऱ्यांवरील अतिक्रमण वाढलं आहे, किनारपट्टी रस्ते बांधले जात आहेत, आणि अथक प्रदूषणामुळे सखल प्रदेश, जलाशय व समुद्र या ठिकाणांची अपरिवर्तनीय हानी झाली आहे. या प्रक्रियांचा परिणाम म्हणून मासेमारीमध्ये घट झाली आहे. विशेषतः लहान स्तरावरील कष्टकरी मच्छिमारांच्या उपजीविकेवर याचा विपरित परिणाम झाला असून त्यांच्यातील दुरावलेपण वाढलं आहे. शिवाय, समाजातील विषमताही यातून वाढत जातात.

मच्छिमारांच्या पारंपरिक व पिढीजात अधिकारांची दखल न घेता नवीन किनारपट्टी नियमन क्षेत्र धोरण तयार करण्यात आलं आहे, त्यामुळे सामायिक किनारपट्टीच्या वापरासंदर्भात मच्छिमारांच्या पारंपरिक नियमांचा भंग करणं वैध ठरू लागेल. यातून स्रोतवापरासंबंधीचे संघर्ष तीव्र होतील, अखेरीस किनाऱ्यांवरील मच्छिमारांमधील दुरावलेपण वाढत जाईल. त्यांच्या अधिकारांचं व किनारपट्टीसंबंधीच्या अधिकारांचं रक्षण करण्यासाठी कायदेही नाहीत. विकासामुळे अनेकांना विस्थापन सहन करावं लागतं आणि मोठ्या प्रमाणावर उपजीविकेचा ऱ्हास होतो, अशी भीती मच्छिमारांच्या संघटनांनी व्यक्त केली आहे. ही भीती अनाठायी नाही. अलीकडच्या वर्षांमध्ये किनारपट्टीवर आंतरराष्ट्रीय मालवाहू जहाजथांबे व बंदरं यांसारखे बडे विकासप्रकल्प उभारण्यात येऊ लागले आहेत, त्याचा समुद्री जीवनावर विपरित परिणाम झाला असून हजारो मच्छिमारांना किनाऱ्यावरील निवारा सोडावा लागला आहे. त्यांच्या योग्य पुनर्वसनाच्या अंमलबजावणीसाठी कोणत्याही ठोस धोरणाची आखणी झालेली नाही. त्यामुळे मच्छिमारांच्या उपजीविकेला दुर्लक्षून इतर हितसंबंधी गटांच्या व्यावसायिक हेतूंना पाठबळ दिल्याने मच्छिमार समुदाय आणखी गरीबीच्या गर्तेत जाईल, ते समाजाच्या परिघावर ढकलले जातील.

राज्यसंस्थेने आधीही मच्छिमार संघटनांच्या मागण्यांकडे लक्ष दिलेलं नाही. आधीचे किनारपट्टी नियमन क्षेत्राचे नियम अंमलात आणण्यात आणि किनाऱ्यांसंबंधीच्या नियमभंगावर चाप बसवण्यात सरकारला बहुतांशाने अपयशच आलेलं आहे. पण किनारपट्टी क्षेत्रांमधील शासनात बदल करणाऱ्या नवीन सीमारेषा एक विचित्र राजकीय प्रक्रिया उघड करणाऱ्या आहेत. राष्ट्रीय मच्छिकामगार मंचासारख्या मच्छिमार संघटनांशी वा इतर संघटनांशी उचित चर्चाही न करता आणि सामाजिक-पर्यावरणीय चिंतांची पर्वा न करता खाजगी नफ्याचाच विचार करणारी ही प्रक्रिया आहे. त्यामुळे, कॉर्पोरेट भांडवलाच्या पाठबळावर सुरू असलेल्या धोरणनिर्मितीच्या राजकारणाने स्रोतावलंबी लोकांच्या उपजीविकेशी संबंधित समस्यांची आणि किनारा परिसंस्थेच्या संवर्धनाशी व टिकावाशी संबंधित विविध परस्परसंबंधी प्रश्नांची दखल घेतलेली नाही. दीर्घकालीन विचार करता या सर्व गोष्टींसाठी समाजाला मोठी किंमत मोजावी लागेल. सर्वांगीण विकासाच्या ध्यासाला यातून बाधा पोचते आणि वंचनेची नवीन रूपे आकार घेतात.

●

# प्राचीन भारत, आधुनिक विज्ञान आणि असुरक्षितता

*भारतीय विज्ञान परिषदेमध्ये करण्यात आलेले दावे विज्ञान व तंत्रज्ञानाच्या अस्सल शोधप्रक्रियेपासून फारकत घेणारे आहेत.*

पुन्हा एकदा या वर्षीच्या भारतीय विज्ञान परिषदेमध्ये आपल्या प्राचीन ऋषींच्या महान उपलब्धींविषयी वेडगळ दावे करण्यात आले. जणू काही या सर्व गोष्टींना तथ्यांचा आधार आहे, अशा पद्धतीने ही मांडणी झाली. गेल्या चार वर्षांमध्ये भारतीय विज्ञान परिषदेच्या सत्रांमध्ये ही त्रासदायक परिस्थिती सातत्याने दिसते आहे.

आधुनिक वैज्ञानिक संशोधनामध्ये आणि विज्ञानाच्या इतिहासामधील संशोधनामध्ये भारताने कोणतं यश मिळवलं, हे मांडण्यासाठी या परिषदेचं आयोजन केलं जातं. परंतु, धादान्त खोटेपणाला या सत्रांमध्ये मंच उपलब्ध करून दिला जातो तेव्हा भारतीय विज्ञानाचा अपमान होतो. गेल्या चार वर्षांमध्ये हा एकसुरी खोटेपणा या परिषदेत न चुकता दिसतो.

सर्वसाधारणतः अशा दाव्यांना रास्त तिरस्काराला सामोरं जावं लागतं आणि भारतीय विज्ञान परिषदेच्या सत्रांमध्ये त्यांना जागा मिळत नाही. पण स्वतः पंतप्रधान आणि भारताच्या वाट्याला आलेले इतर नेतेच अशा वेडगळ मांडणीचा पुनरुच्चार करत असतील, तर या खोटेपणाला प्रत्युत्तर देणं गरजेचं ठरतं.

आपल्या पूर्वजांच्या उपलब्धींमधील मैलाचे दगड समजून घेणं सर्वांनाच भावतं. आपण कोण आहोत आणि आपण आहोत तसे का आहोत, याचे धागेदोरे या प्रक्रियेत दडलेले असतात. इतर सर्वच दाव्यांप्रमाणे या दाव्यांमागील सत्य वा असत्य निश्चित करण्यासाठी चिकित्सक विश्लेषण आवश्यक असतं. आपल्या गतकालीन उपलब्धींविषयीचा कोणताही महत्त्वाचा दावा- उदाहरणार्थ, विमानाच्या शोधासंबंधीचा दावा- चिकित्सक अभ्यासाच्या कक्षेत व्हायला हवा, प्रतिष्ठित वैज्ञानिकांकडून त्याची पुनर्रचना व्हायला हवी, परंतु असं होत नाही. त्यामुळे आपल्या मांडणीच्या सत्यतेविषयी निराधार दावे करत राहाणाऱ्यांना अशा सत्रांमध्ये वेळ व जागा उपलब्ध करून देणं रास्त ठरत नाही.

बहुतांश वेळा, अशा दाव्यांच्या मूल्यमापनासाठी विज्ञानाची फार मोठी समजही लागत नाही. विज्ञान टप्प्याटप्प्याने विकसित होतं, प्रत्येक पिढी आधीच्या उपलब्धींवर स्वतःची मांडणी करते. क्वचित प्रसंगी लक्षणीय उडी मारली जाते. उदाहरणार्थ, पेशींचं स्वरूप समजून घेण्यासाठी सूक्ष्मदर्शकाची गरज होती; जीवनाच्या जनुकीय स्वरूपाची तपासणी करण्यासाठी क्ष-किरणांद्वारे स्पेक्ट्रोस्कोपी साधण्याची गरज होती, त्यातून दुहेरी हेलिक्सचा आकृतिबंध लक्षात आला; आणि हवेपेक्षा जास्त वजनाच्या वस्तू हवेत उचलल्या जाण्यासाठी काय करावं लागेल, हे कळल्यावरच विमाननिर्मिती शक्य झाली. आधुनिक कालखंडातील पहिली विमानं अंतर्गत ज्वलनशील इंजिनासह तयार करण्यात आली. सूर्यमाला सूर्याभोवती फिरते आणि पृथ्वी हा या सूर्यमालेचा केवळ एक लहान भाग आहे, हे लक्षात आल्याशिवाय आंतरखंडीय प्रवास शक्य नव्हता (अशा प्रवासासंबंधीचा दावा परिषदेत करण्यात आला). यातील कोणतीही संकल्पना प्राचीन भारतात अस्तित्वात नव्हती.

त्यामुळे कौरवांचा जन्म टेस्ट-ट्यूट तंत्रज्ञानाद्वारे झाला, असा दावा कोणाला करायचा असेल, तर उच्च दर्जाच्या स्वच्छता खोल्या, गर्भातील जीवाच्या उत्क्रांतीची सखोल समज, इत्यादी गोष्टींसह संपूर्ण पायाभूत रचना त्या काळी अस्तित्वात होती, हे संबंधित व्यक्तीला सिद्ध करावं लागेल. त्या काळी वीज अस्तित्वात असल्याचाही पुरावा आपल्याकडे नाही, मग स्वच्छता खोल्या व जीवनाचं रेणवीय ज्ञान या

गोष्टी तर दूरच राहिल्या. आणि, प्राण्यांमध्ये परस्परांना अवयव प्रत्यारोपण करणं तर व्यवहार्यच मानलं जात नाही, कारण त्यांचं रक्त परस्परांना जुळत नाही, गळ्याच्या रचनेमध्ये मूलभूत फरक असतात आणि मेंदू व शरीर यांच्यातील संबंध अशा शक्यतांना सुसंगतच नाहीत.

भारतात काही महान उपलब्धी झाल्याच नाहीत, असा याचा अर्थ नाही. पण बहुतांश विज्ञानाप्रमाणे आदर्शलक्ष्यी अभ्यासांमधून निघालेल्या महान संकल्पनांची जागा युरोपीय विज्ञानातील अधिक उंची गाठलेल्या अनुमानलक्ष्यी पद्धतींनी घेतली आहे. त्यामुळे आपल्या पूर्वजनांवर खोट्या उपलब्धी लादायची गरज नाही. विशेष म्हणजे अशा प्रकारचे सर्व दावे गतकालीन शोधांविषयीचे असतात, त्यात कोणत्याही भविष्यातील शोधाचा अंदाज वर्तवलेला असतो.

पण एकेकाळी निखळ देदिप्यमान युग अस्तित्वात होतं आणि इतरांनी ते दडपलं आहे, असे भ्रम काहींना होतात. एकविसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकातही आपल्याला आपले भ्रम दूर करता आलेले नाहीत. सर्वसाधारणतः अशा भ्रमांवरचा उतारा म्हणून संबंधितांकडून दाव्यासाठी पुरावा मागितला जातो आणि दाव्यामधील उपलब्धीसाठी गरजेची असलेली पायाभूत रचना अस्तित्वात असल्याचं सिद्ध करून दाखवावं लागतं. पण सध्याच्या घडीला अशा दाव्यांना राष्ट्रातील सत्ताधाऱ्यांकडूनच आदराची वागणूक दिली जाते, यामुळे राष्ट्राची अनेक मार्गांनी हानीच होणार आहे. अशा दाव्यांमुळे आपल्या पूर्वजांच्या कामाविषयी प्रामाणिक अभ्यास करणाऱ्यांचंही हसं होईल आणि त्यांचं श्रेय नाकारलं जाईल. भारताला पुढे जाण्यापासून आणि आपल्या मर्यादित स्रोतांसह विज्ञान व तंत्रज्ञान यांचा शोध घेण्यापासून विचलित करणारे हे दावे आहेत. अविवेकी दाव्यांना आदराचं स्थान देऊन आपल्या भावी पिढ्यांसाठी चुकीचा पायंडा यामुळे पडतो. अशा दाव्यांच्या मांडणीनुसार संबंधितांची राष्ट्राबद्दलची निष्ठा मोजली जाते, तेव्हा ही प्रक्रियाच अतिशय विषारी व आपत्तीजनक ठरते.

अशा प्रकारचे वेडगळ दावे मुख्यप्रवाही भारतीय संभाषितामधून बाजूला करायला हवेत. भूतकाळाचा योग्य अभ्यास करण्याचा विचार भारत गांभीर्याने करत असेल, तर प्राचीन विज्ञानाचा वस्तुनिष्ठ अभ्यास गरजेचा आहे. प्राचीन चिनी विज्ञानाविषयी नीधम संशोधन संस्था ज्या प्रकारचं काम करते आहे, तसं काम व्हावं लागेल. अशा संस्थेने अभ्यास सादर करावा आणि मग विचारसरणीय अंतःप्रवाह नसलेल्या इतर अभ्यासकांनी त्याला आव्हान द्यावं, त्याच्या पुराव्यांचं मूल्यमापन करावं.

अशा प्रकारच्या प्रतिगामी घडामोडींना विरोध करण्यामध्ये सर्वसाधारणतः अकादमिक विश्वास उत्साह दाखवतं, पण उच्चपदस्थ वैज्ञानिकांनी अधिक आवाज उठवण्याची गरज आहे.

●

**अनु. : प्रतिनिधी**

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे विविध संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाउंडेशन'चे साहाय्य लाभले आहे. (१२ व १९ जानेवारी २०१९ या अंकांतून)

*''...प्रवाहाच्या विरुद्ध एक पाऊलही टाकणं अशक्यच... श्वास गुदमरतो, जीव तडफडतो... पुन्हा जीव जाता जाता 'जगणं' हे किती महत्त्वाचं हे कळतं. मरणं सोपं नसतं कारण तशी संपूर्ण निराशाही क्वचितच येते. काही चांगले क्षण कळत नकळत येऊन चिकटलेले असतात. ते हळूवार फुंकर घालतात. माणूस अपूर्ण. त्याला मिळणारं सुख अपूर्ण आणि दुःखही अपूर्ण...''*

**विद्युत भागवत**

विद्युत भागवत यांची
**आरपारावलोकिता** ही कादंबरी
लवकरच प्रसिद्ध होणार...

आगाऊ नोंदणी सुरू
पृ. सं. २८४, मूळ किंमत ३०० रु.
सवलत किंमत १७० + ५० रु. पोस्टेज खर्च एकूण : २२०/-*
संपर्क : **हरिती प्रकाशन** ९७६९६५५७३८ (व्हॉटस ॲप क्रमांक)
** पुणे, लातूर, औरंगाबाद टपाल खर्च नाही.*